MHAH220001772022

रे.मु.नं. ३३/२०२२
शिवाजी उर्फ शिवम वि. संदिप राजाराम व इतर

<u>आदेश</u>
(नि.क्र.४६ खाली)

प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे मयत प्रतिवादी क्र. २ चे वारस रेकॉर्डवर घेणेकामी व त्यानुशंगाने दाव्यात दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व अर्जावरील म्हणणे वाचले. संपुर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदार/वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादींविरुध्द वाटप, जाहीर ठराव व निरंतर मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. २ अनुसया राजाराम सायकर या दि. ०६/०९/२०२१ रोजी मयत झालेल्या आहेत. त्यांना एक मुलगा प्रतिवादी क्र. १ व दोन मुली प्रतिवादी क्र. ३ व ४ हेच कायदेशीर वारस आहेत. सदर मयत प्रतिवादी क्र. २ अनुसया राजाराम सायकर यांचे कायदेशरी वारस प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांना यापुर्वीच सदर दाव्यात प्रतिवादीपणात सामाविष्ट केलेले आहे. प्रतिवादी क्र. १, ३ व ४ यांचे व्यतिरीक्त मयत प्रतिवादी क्र. २ अनुसया राजाराम सायकर हिस इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे वादीने मयत प्रतिवादी क्र. २ यांचे नावापुढे मयत असे नमुद करुन दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. १ तर्फे सदर अर्जावर म्हणणे दिले आहे व अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. वादीने अभिलेखावर प्रतिवादी क्र. २ अनुसया राजाराम सायकर या दि. ०६/०९/२०२१ रोजी मयत झाल्याबाबत ग्रामपंचायत कार्यालय, आखोणी, ता. कर्जत, जि. अहमदनगर यांचा मृत्यू दाखला दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी अर्जास स्पष्टीकरणासह आक्षेप नोंदवला नाही. मयत प्रतिवादी क्र. २ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला उशीरमाफीचा अर्ज मंजुर केलेला आहे. अर्ज, शपथपत्र, प्रतिवादीचे म्हणणे व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला असता प्रथमदर्शनी असे दिसून

येत आहे की, प्रतिवादी क्र. २ अनुसया राजाराम सायकर यांचे अर्जात नमुद केल्याप्रमाणे वारस आहेत व सदर वारसदार हे अभिलेखावर प्रतिवादी क्र. १, ३ व ४ म्हणुन सामाविष्ट असल्याने प्रतिवादी क्र. २ अनुसया राजाराम सायकर यांचे नावापुढे मयत असे नमुद करुन दुरुस्ती करणेची आवश्यकता आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र. २ अनुसया राजाराम सायकर यांचे नावापुढे मयत हा शब्द लिहुन दुरुस्ती करण्याची वादीला परवानगी देण्यात येत आहे. सदरची दुरुस्ती वादीने पुढील तारखेपर्यंत करुन दुरुस्ती वादपत्र अभिलेखावर दाखल करावे.

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.10.28 16:57:23 +0530

(आर. बी. राऊत)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कर्जत, जि. अहमदनगर.

स्थळ : कर्जत.
दिनांक :२८/१०/२०२५.